# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

Ganeshkhind, Pune - 411007
गणेशखिंड, पुणे - ४११००७
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/९७
Telephone : 020-25621188/97
ईमेल/ Email : affiliation@pun.unipune.ac.in


संदर्भ क्र : सीए/२१५८ दिनांक : १५/११/२०२२

प्रती,
मा. प्राचार्य/ संचालक,
संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय — माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत.**
**संदर्भ — मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ०४/०८/२०२२ रोजीचे परिपत्रक .**

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित शासकीय/ अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंमलात आल्यानंतर सदर अधिनियमातील कलम ४ व ५ मधील तरतुदींनुसार अपेक्षित १७ बाबींमधील माहिती तयार करुन जनतेसाठी संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणे तसेच ती वर्षातून दोनदा (माहे जानेवारी व माहे जून) अद्ययावत करणे अनिवार्य असून सदर अधिनियमातील कलम ५ मधील तरतूदीनुसार सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यांना पदनिर्देशित करणे अनिवार्य व बंधनकारक आहे.

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये, ब—याचशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी वरील तरतुदींचे पालन केलेले नसून उपरोक्त अधिनियमानुसार नागरिकांमधून मागणी केलेली माहिती अधिकार अर्जावर कार्यवाही करणे/ विहित वेळेची मर्यादा न पाळणे, माहिती देण्यास विलंब करणे अशा बाबी निदर्शनास येत आहेत, सदरची बाब ही प्रशासकीयदृष्टया गंभीर असल्याचे कळविले आहे. सदर पत्र सोबत जोडलेले आहे.

तरी सर्व संलग्नित शासकीय/ अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ नुसार वर नमूद केल्याप्रमाणे माहिती प्रसिध्द करावी तसेच सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना पदनिर्देशित करुन सर्व माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करावी त्याचप्रमाणे उपरोक्त अधिनियमातील तरतूदींच्या अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करावी आणि जी संलग्नित शासकीय/ अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणार नाहीत त्यांना थेट जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला
17/11/2022
(स. द. डाबखर)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

Z/Desktop/2022/General Letters New

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ ०२०/२६१११११५३

क्रमांक उशिस२०२२/ माहिती अधिकार अपिल/ मविनावि/ 10380 दि- 4 AUG 2022

**परिपत्रक**

**विषय- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सहाय्यक जनमाहिती अधिकारी जनमाहिती अधिकारी तसेच अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्याबाबत**

संदर्भ-१.संचालनालयाचे पत्र क्र.उशिस/२०२२/प्रक्र.०२/ जनरल मवि-१ /४३३१ दि.२६.४.२०२२
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.उशिस/मा.अ.अ./मवि-१/२०२२/४४०८दि.२८.४.२०२२
३. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२५२/१५)सहा दि.२८.०१.२०१६
४.सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/ प्र.क्र.(२३६/१५) सहा.दि.१९.१२.२०१५
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.केमाअ२०१३/१५६/प्रक्र३६०/सहा.दि.०९.५.२०१४

माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा दिनांक १२.१०.२००५ पासून अंमलात आला आहे, या अधिनियमातील कलम ४ व ५ च्या तरतूदीनुसार अपेक्षित १७ बाबींवरील माहिती तयार करून जनतेकरीता उपलब्ध करणे तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करणे याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. संदर्भ क्रमांक १ अन्वये सर्व सहसंचालक कार्यालयांना त्यांचे अधिनस्त सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये/सर्व अकृषी विद्यापिठांमध्ये माहिती अधिकारी / जनमाहितीअधिकारी यांच्या नियुक्ती करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

सबब उक्त निर्देशानंतर देखील काही विभागात, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मागणी केलेली माहिती अधिकार अर्जावर कार्यवाही करणे /विहीत वेळेची मर्यादा न पाळणे माहिती देण्यास विलंब करणे अशा बाबी निदर्शनास येत आहेत,सदरची बाब ही प्रशासकीयदृष्टया गंभीर आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) (ग) नुसार माहिती मिळविण्यासाठी केलेल्या मागणीस विर्निदिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) नुसार संचालनालयाकडे थेट अपील अर्ज दाखल करत असल्याची बाब निदर्शनास येत आहे.

सबब संदर्भ ४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविणा-या अर्जदारांना माहिती उपलब्ध करून देण्याबाबत सर्वसाधारणबाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत, सदरहू बाब विचारात घेता, शासनाचे व संचालनालयाचे संदर्भीय परिपत्रक तसेच शासन निर्णय/परिपत्रकातील तरतूदीनूसार विहीत कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रति-१ सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य
२.प्राचार्य/कुलसचिव,सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/ सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे -महाराष्ट्र राज्य